# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार - edutech E-mail : desk12@dte.org.in Internet :http//www.dte.org.in


**कार्यालयीन आदेश**

क्रमांक १२(२)/आस्था/कंनि/२०१३/२७१०
दिनांक : 27 JUN 2013

**विषय : विशिष्ट कालावधीसाठी कंत्राटी स्वरुपाची सेवा.....**

तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रम, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र इ. अभ्यासक्रमाची प्रवेश, परीक्षा व प्रवेशाची तात्कालीक कामे तंत्रशिक्षण संचालनालयाकडे सोपाविण्यात आलेली आहेत. मात्र त्यासाठी पदनिर्मिती करण्यात आलेली नाही. शिवाय उपरोक्तपैकी काही योजना नेमक्या किती कालावधीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून हाताळल्या जातील. याबाबतची निश्चित कालमर्यादा शासनाने निर्धारीत केलेली नाही. त्यामुळे सदर कामासाठी कंत्राटी स्वरुपाच्या सेवा घेऊन सदर कामकाज करण्याचे शासन निर्देश आहेत. उपरोक्त बाबी विचारात घेऊन तंत्रशिक्षण संचालनालयाने सदर सेवा पुरविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविले होते व कामाचे स्वरूप व व्याप्ती विचारात घेऊन उमेदवारांनी धारण करावयाची अर्हता निश्चित केली होती. सदर निकषांचे आधारे उमेदवार सेवा पुरविण्यास सक्षम आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी संचालनालयाचे स्तरावर समिती गठीत केली होती. सदर समितीने पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष बोलावून त्यांचे प्रमाणपत्रांची पडताळणी करुन मुलाखतीद्वारे सदर कामासाठी योग्य उमेदवारांच्या शिफारशी केल्या आहेत. सदर उमेदवाराची पात्रता ठरवितांना कोणत्याही विशिष्ट पदासाठीचे शासनमान्य सेवाप्रवेश नियम आधारभूत धरण्यात आलेले नाहीत. कामाची निकड विचारात घेऊन खालील उमेदवारांची त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या कामासाठी एकत्रित मासिक मोबदल्यावर सेवा घेण्याचे संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आदेशित करीत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | कामाचे स्वरुप | एकत्रित मासिक मोबदला |
|---|---|---|---|
| १. | श्री. पाटील प्रमोद दामोदर | लिपिक वर्गीय स्वरुपाची व टंकलेखनाची कामे | रु. ८,०००/- |
| २. | श्री. गाडेकर ज्ञानेश्वर बसवंत | | रु. ८,०००/- |
| ३. | श्री. निकम स्मिता अशोक | | रु. ८,०००/- |
| ४. | श्री. कारभारी मनाली उमेश | | रु. ८,०००/- |
| ५. | श्री. गायकवाड आशिष जगन्नाथ | | रु. ८,०००/- |
| ६. | श्री. राक्षे ज्योती पोपट | | रु. ८,०००/- |
| ७. | श्री. चव्हाण पूनम तानाजी | | रु. ८,०००/- |

उपरोक्त उमेदवारांना मासिक एकत्रित मोबदला, संचालकांच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून अदा केला जाईल. उपरोक्त सेवेसाठी रिक्त पदांची संख्या, सामाजिक आरक्षण, अपंग व समांतर आरक्षण इत्यादीबाबतचे धोरण विचारात घेऊन त्याआधारे निवड केलेली नसल्याने याबाबतचा तपशिल उमेदवाराच्या नावासमोर दर्शविलेला नाही. वरील उमेदवारांच्या कंत्राटी स्वरुपाच्या सेवा पुढील अटींच्या अधिन राहून घेण्यात येत आहेत.

१. कंत्राटी तत्वावरील उमेदवारांच्या सेवा दि. ३१.१०.२०१३ पर्यंत किंवा योजना सुरु असेपर्यंत (जे आधी घडेल तोपर्यंत) या कालावधीसाठीच असतील, त्यानंतर या कंत्राटी स्वरुपाच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

२. वरील उमेदवारांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या एकत्रित मासिक मोबदल्यावर विशिष्ट कालावधीसाठी कंत्राटी तत्वावर सेवा घेण्यात येत असून त्याव्यतिरिक्त त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. सोबत जोडलेल्या जोडपत्रातील करारनामा कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेल्या उमेदवारांना प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी १०० रुपयांच्या स्टँपपेपरवर लिहून द्यावा लागेल, अन्यथा सदर आदेशाच्या अनुषंगाने त्यांची सेवा घेतली जाणार नाही.

४. ज्या उमेदवारांच्या सेवा कंत्राटी तत्वावर घेतलेल्या आहेत, त्यांचे काम समाधानकारक नसल्यास अथवा सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय त्या उमेदवारांच्या सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

५. ज्या उमेदवारांच्या सेवा कंत्राटी तत्वावर घेतलेल्या आहेत त्या उमेदवारांनी या आदेशाचे दिनांकापासून ८ दिवसांत या संचालनालयात तात्काळ हजर व्हावे. अन्यथा त्यांच्या सेवेचे आदेश आपोआप संपुष्टात येतील, त्याबाबत पुनर्विचार करण्यात येणार नाही.

६. ज्या उमेदवारांच्या सेवा कंत्राटी स्वरुपात "जोपर्यंत आवश्यकता आहे तोपर्यंत" या तत्वावर घेतलेल्या असल्याने संबधीतांना नियमित नियुक्तीधारकांचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत किंवा त्यांची सेवा सातत्याची मागणी मान्य केली जाणार नाही. भविष्यात या संचालनालयांतर्गत रिक्त असणा-या व होणा-या पदांसाठी त्यांना दावा सांगता येणार नाही.

७. उपरोक्त उमेदवारांच्या सेवा कंत्राटी तत्वावर घेण्यात येत आहेत त्यांनी त्यांचेकडे सोपविलेली तद्नुषंगिक इतर कामे करणे बंधनकारक राहील.

८. उपरोक्त उमेदवारांच्या सेवा कंत्राटी तत्वावर घेण्याची कार्यवाही उमेदवारांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे फौजदारी स्वरुपाचे आरोप नाहीत असे गृहीत धरुन करण्यात येत आहे. तसे आढळल्यास त्यांच्या सेवा घेण्याचे तात्काळ थांबविले जाईल.

९. सदर आदेशाचा विहीत कालावधी संपताच आदेश आपोआप संपुष्टात येतील. त्यासाठी वेगळे आदेश काढले जाणार नाहीत.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर**

१. मा. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (मानार्थ) (कार्यासन क्र. ६, मु.का.मुंबई यांचेमार्फत)
२. कार्यासन क्र.६, मु.का.मुंबई.
३. संबंधित उमेदवार
४. कार्यासन क्रमांक १२ निवड नस्तीस

## कंत्राटी तत्वावर सेवा पुरविणा-या उमेदवाराने रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर द्यावयाचे हमीपत्र

ज्याअर्थी मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक- ----------------------दिनांक------------ नुसार श्री/श्रीमती/कुमारी------------------------------------------- राहणार-----------------------------------(यापुढे उमेदवार म्हणून उल्लेख केला जाईल.) यांच्या सेवा पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर कंत्राटी पध्दतीने- ----------------------------------------या कालावधीसाठी घेण्यात येणार आहेत. आणि त्याअर्थी मी श्री /श्रीमती/कुमारी --------------------------------------------------- लिहून देतो/देते की,

१. मला प्राप्त झालेल्या कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक मधील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या आहेत आणि त्या मला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

२. जर माझ्याकडून एखाद्या अटी व शर्तीचा भंग झाला तर -------------------------------------स्वरुपाच्या कामासाठी कंत्राटी तत्वावर घेतलेली माझी सेवा रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.

३. मी या संदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वेच्छेने सदर कंत्राटी सेवा स्विकारीत आहे.

४. मी स्विकारलेल्या कंत्राटी सेवेनंतर संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे मला कायमस्वरुपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही. तसेच या आदेशात नमूद कालावधीनंतर सदर सेवेबाबतची शासनावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटी सेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी मी करणार नाही, अशी या हमीपत्राद्वारे हमी देत आहे.

५. माझे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास माझ्या सेवा घेण्याचे विहीत कालावधीपूर्वी थांबविले जाईल याची मला जाणीव आहे. याबद्दल माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

दिनांक

ठिकाण

स्वाक्षरी------------------------------

( नांव )-------------------------

समक्ष :-

१)----------------------------------------------------------------------

२)----------------------------------------------------------------------

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई याच्यांसाठी आणि यांच्या वतीने